पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन,
शिक्षण विभाग (प्राथ)
जा.क्र.जिप/शिक्षण/प्राथ/२/१५/२१/~~कॅम्प~~/२००३
पुणे दिनांक : १८/१०/२००३.

प्रति,
मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
फ्रेंडस् प्रायमरी स्कूल कोरेगाव भिमा, ता. शिरूर जि.पुणे.

विषय- सन२००३-२००४ या शैक्षणिक वर्षासाठी खासगी ~~अनुदानित~~ / विना ~~अनुदानित~~/ कायम विना अनुदानित प्राथमिक शाळेतील शिक्षक पटसंख्या निश्चिती, इयत्ता निहाय तुकडया मान्यता, शिक्षक मान्यता इ.बाबत.

१) आपल्या खासगी प्राथ. शाळेतील सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षातील दिनांक ३०/९/२००३ (ची इयत्ता) निहाय विद्यार्थी पट उपस्थिती नुसार आपले शाळेस सन २००३ -२००४ या शैक्षणिक वर्षासाठी अनुदान/ विना अनुदान/कायम विना अनुदान तत्वावर सोबतचे तक्ता क्र.१ मध्ये दर्शविले प्रमाणे इ.निहाय तुकडयांना मान्यता देणेत येत आहे.
२) तक्ता क्र. २ मध्ये इ.निहाय विद्यार्थीपट / उपस्थिती व तुकडयांची संख्या विचारात घेवून आपल्या शाळेस सन २००३-२००४ या शैक्षणिक वर्षासाठी मुख्याध्यापक, शिक्षक, पदवीधर शिक्षक , पदांना मान्यता देणेत येत आहे.
३) शाळेची पटसंख्या कमी झाल्याने देय होणा-या तुकडया व शिक्षकांची संख्या तक्ता क्र.१ मधील रकाना क्र.७ मध्ये दर्शविली आहे. अतिरिक्त शिक्षक ठरल्यास त्याची माहिती ठरवून दिलेल्या नमून्यात या कार्यालयास पाठवावी.
४) जर तुकड्या व्यतिरिक्त कोणत्याही परिस्थितीत जादा तुकडया चालू ठेवण्यात येवू नये. मंजूर न झालेल्या तुकडयांच्या संदर्भात नियुक्त केलेल्या शिक्षकांची / कर्मचा-यांची वेतनाची जबाबदारी शासन घेणार नाही. तसेच नामंजूर तुकडयामधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसानीस शासन जबाबदार असणार नाही.
५) ज्या शिक्षकांना वैयक्तिक मान्यता दिलेली आहे त्याच शिक्षकांची देयके तयार करून शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प. पुणे यांचेकडे सादर करावी.
६) ज्या कर्मचा-यांना मान्यता देण्यात आलेली नाही अशा कर्मचा-यांचे प्रस्ताव ठरवून दिलेल्या कार्यपध्दती नुसार शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठवावे.
७) शाळेने आपले अधिकारात ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देवू नये शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचे पूर्व परवानगीने विद्यार्थीसंख्या ६० पर्यंत वाढवता येईल.

### सन २००३-२००४ या वर्षासाठी इ.निहाय मंजूर वर्ग / तुकडयांचा तक्ता

| इयत्ता | पट | उपस्थिती | सन २००२-२००३ मधील मंजूर तुकडया | सन २००३-२००४ मधील मंजूर तुकडया | पटसंख्याने कमी होणाऱ्या | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | तुकडया | शिक्षक | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ ली | ४३ | ४३ | १ | १ | - | - | |
| २ री | ४२ | ४२ | १ | १ | | - | |
| ३ री | २८ | २८ | १ | १ | | | |
| ४ थी | २६ | २६ | १ | १ | | | |
| ५ वी | २० | २० | - | १ | | | |
| ६ वी | १३ | १३ | - | १ | | | |
| ७ वी | १० | १० | - | १ | | | |
| | | | | | | | |
| एकूण | १८२ | १८२ | ४ | ७ | | | |

तक्ता क्रं. २

सन २००३-२००४ मध्ये खाजगी प्राथमिक शाळेतील मान्य केलेल्या पदांची संख्या

| अ.क्र. | प्रकार | सन २००२ - २००३ मध्ये मंजूर केलेल्या पदांची संख्या | सन २००३- २००४ मध्ये मान्य केलेल्या पदांची संख्या | कमी झालेली पदे | जादा झालेली पदे |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुख्याध्यापक | – | १ | – | – |
| २. | उपशिक्षक | ४ | ४ | – | १ (नैसर्गिक वाढ तुकडी) |
| ३. | पदवीधर शिक्षक | – | – | – | – |
| ४. | लिपिक | – | – | – | – |
| ५. | परिचर /शिपाई | – | – | – | – |
| | एकुण | ४ | ५ | – | – |

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे करिता